पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ- क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग

## जाहीर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ-क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात मे. एक्साईड इंडस्ट्रीज ली. यांचेमार्फत (१) के.एस.बी. चौक, चिंचवड व (२) थरमॅक्स चौक, चिंचवड या ठिकाणी C.S.R. चे माध्यमातुन तरंगत्या लोकसंख्येसाठी महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणेत आली आहेत. सदर स्वच्छतागृहांची नागरिकांकडून शुल्क आकारुन ( पैसे द्या व वापरा तत्वावर ) दैनंदिन स्वच्छता, दुरुस्ती व देखभाल यासाठी ३ वर्षे कालावधीकरीता एजन्सी नियुक्त करावयाची आहे. याकामी इच्छुक एजन्सी यांचेकडून प्रस्ताव मागविणेत येत आहेत. याबाबतच्या अटी / शर्ती महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in 2.https://mahatenders gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील. त्याबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005,0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा. त्यानुसार इच्छुक एजन्सी / संस्था यांनी दिनांक १७/०९/२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत आपले प्रस्ताव सिलबंद पाकिटात आवश्यक त्या अद्यावत कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह मा. क्षेत्रीय अधिकारी, अ-क्षेत्रीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निगडी – ४११ ०४४ यांचे नावे त्यांचे कार्यालयात सादर करावेत.

**सही/-**
क्षेत्रीय अधिकारी
अ-क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी – ४११ ०४४

जाहीरात क्रमांक १६१
क्रमांक - अक्षेका/आ/५/कावि/३८/२०१८
दिनांक ३१/०८/२०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग
# जाहीर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका C.S.R. ( Corporate Social Responsibility ) चे माध्यमातुन म.न.पा. हद्दीत तरंगत्या लोकसंख्येसाठी स्वच्छ भारत मिशन (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) अंतर्गत महिला व पुरुषांकरीता "पैसे द्या व वापरा " या तत्वावर मे. एक्साईड इंडस्ट्रीज यांचेमार्फत खालील ठिकाणी नव्याने सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणेत आली आहेत. याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | सार्वजनिक शौचालयाचे ठिकाण | तपशिल | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | के.एस.बी. चौक, चिंचवड | महिला स्वच्छतागृह – २ सिट्स,<br>पुरुष स्वच्छतागृह – २ सिट्स,<br>पुरुष मुत्रालय - २ सिट्स, वॉश बेसिन | ३ वर्ष |
| २ | थरमॅक्स चौक, चिंचवड | महिला स्वच्छतागृह – २ सिट्स,<br>पुरुष स्वच्छतागृह – २ सिट्स,<br>पुरुष मुत्रालय - २ सिट्स, वॉश बेसिन | ३ वर्ष |

अटी व शर्ती –

१) उपरोक्त नमुद ठिकाणी C.S.R. ( Corporate Social Responsibility ) चे माध्यमातुन मनपा हद्दीत तरंगत्या लोकसंख्येसाठी "पैसे द्या व वापरा" तत्वावर उभारणेत आलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाचे देखभालीसाठी या कामाचा अनुभव असलेल्या एजन्सीची नियुक्त करणेकामी इच्छुक एजन्सी / व्यक्ती संस्था यांनी मा. क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निगडी ४११ ०४४ यांचे नावे सिलबंद पाकीटात प्रस्ताव दिनांक १७/०९/२०१८ पर्यंत सादर करावेत.

२) प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे सादर करावीत.
   १. संस्था नोंदणीकृत असलेबाबत शॉपअॅक्ट अद्ययावत नूतनीकरण असलेला परवाना.
   २. संस्थेच्या मागील २ वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल.

३) याकामी प्रत्येक ठिकाणास स्वामित्व धन (रॉयल्टी) भरावे लागेल. जास्तीत जास्त स्वामित्व धन (रॉयल्टी) देणा-या संस्थेस सदरचे काम देणेत येईल. अ. क्र. १ व २ चे ठिकाणासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत.

४) याकामी नियुक्त एजन्सीला प्रत्येक ठिकाणासाठी र.रु.५०,०००/- स्वतंत्र अनामत रक्कम मनपा कोषागरात रोख / डी.डी. द्वारे जमा करावी लागेल. त्याच प्रमाणे आवश्यक अटी / शर्तीचा करारनामा करावा लागेल.

५) सदर ठिकाणी शौचालयाचे वापरासाठी प्रति वापर र.रु.२/- शुल्क आकारणेची मुभा एजन्सीस राहिल. तथापि मुत्रालयचे वापरासाठी कोणतेही शुल्क आकारता येणार नाही. तसा दराचा फलक दर्शनी भागात लावणे बंधणकारक राहिल. जादा शुल्क आकारता येणार नाही.

६) सदर शौचालयाचे ठिकाणची संपुर्ण दुरुस्ती, देखभाल स्वच्छता याची संपूर्ण जबाबदारी नियुक्त एजन्सीची राहिल. यासाठी महापालिकेकडून कोणतेही शुल्क अदा करणेत येणार नाही. स्वच्छतेचा दर्जा उच्च दर्जाचा ठेवण्याची जबाबदारी संबंधित एजन्सीची राहिल. स्वच्छतेसाठी अत्याधुनिक स्वयंचलीत यंत्रणेचा वापर करावा लागेल.

७) सदर ठिकाणी २४ तास सेवा पुरविणे अनिवार्य राहिल. स्वच्छतेसाठी नियुक्त कामगारास राहण्याची मोफत सुविधा शौचालयाचे ठिकाणी उपलब्ध असेल. तथापी सदर कामगाराकडून निवासस्थानाचा दुरुपयोग, असभ्य वर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास २४ तासात निवासस्थान खाली करुन पर्यायी व्यवस्था २४ तासात करणेची जबाबदारी नियुक्त एजन्सीची राहिल.

८) कामाची मुदत पूर्ण होताच निवासस्थान सोडणे, निवासीस्थान व स्वच्छतागृहाचा सुस्थितीत महापालिकेस ताबा देणे बंधनकारक राहिल. यामध्ये काही नुकसान झालेचे आढळल्यास त्याची मनपा ठरविल ती नुकसान भरपाई मनपाकडे असलेल्या अनामत रकमेतून करणेत येईल.

९) सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा पुरविणेत येईल. तथापि विद्युत पुरवठ्याचे बिल नियमित व वेळेत भरण्याची जबाबदारी संबंधित एजन्सीची राहिल.

१०) नियुक्त करणेत येणा-या एजन्सीला सदरचे कामाबाबत महानगरपालिकेशी आवश्यक त्या अटी / शर्तींचा र.रु.५००/- चे स्टॅंप पेपरवर स्वखर्चाने करारनामा करावा लागेल. सब ठेकेदार नेमता येणार नाही.

११) सदर कामाची पद्धत बदलल्यास ते मुदतपूर्व बंद करण्याचा अधिकार महापालिकेकडे राहील. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१२) कोणताही / सर्व प्रस्ताव कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

१३) सदर ठिकाणी गैरप्रकार झालेस पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.

१४) काम अचानक बंद करता येणार नाही. काम बंद केलेस अनामत जप्त करुन म.न.पा. कोषागरात भरणेत येईल.

१५) सदर कामावर कामगारांना भविष्यात म.न.पा.मध्ये नोकरीकरीता हक्क सांगता येणार नाही.

१६) काम करतेवेळी कामगारास अपघातात इजा झालेस त्याची जबाबदारी म.न.पा.ची राहणार नाही अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

**सही/-**

क्षेत्रीय अधिकारी
अ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिचवड महानगरपालिका
निगडी ४११ ०४४.

क्र.अक्षेका/आ/५/कावि/**३८**/२०१८
दिनांक ३**१**/०८/२०१८